


देगलूर : देगलूर महाविद्यालयात व्याख्यान संपन्न झाले.

# देगलूर महाविद्यालयात व्याख्यान

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्यावतीने मेडिसिनल केमिस्ट्री या विषयावर अभ्यासपुरक व्याख्यान संपन्न झाले. लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. कामिनवार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.लक्ष्मण सुदाम हे उपस्थित होते व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती लालबहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद येथील प्रा. डॉ.नक्कलवार होते. डॉ. कामिनवार यांनी मेडिसिनल केमिस्ट्री या विषयावरती सखोल मार्गदर्शन केले व पदव्युत्तर वर्गात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नाचे समाधानकारक निराकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.काळे व्ही एन यांनी केले तर आभार प्रा.डॉ.पोकलवार यांनी मानले. या वेळी प्रा. क्यादारे, प्रा.बिरादार, प्रा.अशफिया, प्रा.जोशी व एम.एस.सी. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी उपस्थित होते.